# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:01.11.2025** **वार:शनिवार**

1. विकसित भारताचं स्वप्न साकारण्यासाठी देशाप्रती समर्पित वृत्ती ठेवण्याचं पंतप्रधानाचं आवाहन
2. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राज्यासह देशात एकता दिवस म्हणून साजरी
3. पोलिस दलांतील कर्मचाऱ्यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं जाहीर, महाराष्ट्रातल्या नऊ जणांचा समावेश
4. व्यवसाय सुलभतेच्या दृष्टीनं जिल्हाधिकाऱ्यांना जास्त अधिकार देण्यावर विचार, आणि
5. वीस षटकांच्या दुसरा क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाचा भारतावर विजय

**<u>पटेल जयंती</u>**

विकसित भारताचं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी देशाच्या प्रगतीकरिता प्रत्येक नागरिकानं देशाप्रती समर्पण वृत्ती ठेवावी, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल देशवासियांना केलं. भारताचे लोहपुरूष, पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त गुजरातमधील एकता नगर इथं आयोजित राष्ट्रीय एकता दिवसाच्या समारंभाला संबोधित करताना मोदी बोलत होते. प्रत्येक नागरिकानं देशाला कमकुवत करणाऱ्या विचारांना, कृतीला नाकारायला हवं, ही काळाची गरज असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. स्वातंत्र्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी एक भारत श्रेष्ठ भारत या दृष्टीकोनाला मूर्त रूप देत साडेपाचशेहून अधिक संस्थानं भारतात विलीन केली, असं त्यांनी सांगितलं. सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त देशभरात आयोजित करण्यात आलेल्या एकता दौडविषयी बोलताना पंतप्रधान म्हणाले....

**देशभर में हो रही एकता दौड़, रन फॉर यूनिटी कोटि-कोटि भारतीयों का उत्साह, हम नए भारत की संकल्प शक्ति को साक्षात महसूस कर रहे हैं। अभी यहां जो कार्यक्रम हुए जो अद्भुत प्रस्तुति हुई उनमें भी अतीत की परंपरा थी, वर्तमान का श्रम और शौर्य था और भविष्य की सिद्धि की झलक भी थी।**

देशाच्या सुरक्षिततेला हानी पोहोचवणाऱ्या माओवाद, नक्षलवादापासून देश आता मुक्त होत आहे, पूर्वी 100 हून अधिक जिल्हे माओवादाने प्रभावित होते. आता ही संख्या तीनवर आल्याचं त्यांनी नमूद केलं. सरकारनं नक्षलवाद आणि माओवादी दहशतवादाला निर्णयक धक्का दिल्याचं सांगून पंतप्रधान म्हणाले.....

**आज मैं सरदार पटेल के सानिध्य में, एकता नगर की इस धरती से, पूरे देश को ये भरोसा दिलाता हूं, जब तक देश नक्सलवाद माओवाद, उस आतंक से पूरी तरह मुक्त नहीं हो जाता, हम रुकने वाले नहीं हैं, चैन से बैठने वाले नहीं हैं।**

गुजरातमध्ये एकता नगर इथं झालेल्या कार्यक्रमात सहभागी होत मोदींनी, सरदार पटेल यांच्या स्टॅच्यू ऑफ युनिटी इथं आदरांजली अर्पण केली. त्यांनी उपस्थितांना एकता दिनाची शपथही दिली. यावेळी आयोजित एकता दिन संचलनामध्ये सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव पोलिस दल, आणि विविध राज्यातील पोलीस दल तसंच विविधतेतून एकता या संकल्पनेवर आधारित चित्ररथही सहभागी झाले होते. इतिहास आणि संस्कृतीचं दर्शन घडविणारा महाराष्ट्राचा चित्ररथ विशेष लक्षवेधी ठरला.

**<u>देश-पटेल</u>**

सरदार वल्लभभाई पटेल यांना देशभरातून काल आदरांजली वाहाण्यात आली. अढळ संकल्प, अदम्य धैर्य आणि कुशल नेतृत्व असणारे दूरदर्शी नेते आणि राष्ट्रनिर्माते, ज्यांनी राष्ट्राला एकत्र आणण्याचे कार्य केले अशा शब्दांत राष्ट्रपती द्रौपदी

मुर्मू यांनी त्यांना आदरांजली वाहिली. तर संस्थानांचं विलीनीकरण आणि देशाच्या एकतेसाठी पटेल यांचं अमूल्य योगदान प्रेरणादायी असल्याचं उपराष्ट्रपती सी. पी राधाकृष्णन यांनी आदरांजली वाहाताना म्हणाले. देशाचं अखंडत्व, सुशासन यांप्रती पटेल यांची वचनबद्धता भावी पिढ्यांना प्रेरणादायी ठरेल, अशा शब्दांत पंतप्रधानांनी पटेल यांना आदरांजली वाहिली. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनीही सरदार पटेल यांना आदरांजली वाहिली.

**राज्य एकता दौड**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये एकता दौड, पदयात्रांच्या आयोजनासह एकतेची शपथही घेण्यात आली. पुण्यात पुणे रेल्वे विभाग आणि आंबेगाव पोलीस स्टेशन यांच्या वतीनं राष्ट्रीय एकता दौड अंतर्गत मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं. मुंबईतही अनेक ठिकाणी कलाकारांनी एकता दौडमध्ये भाग घेतला. धाराशिव, बीड, अहिल्यानगर, सोलापूर, कोल्हापूर, चंद्रपूर, धुळे, सांगली, सातारा, रत्नागिरी, वाशिम, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर आदी विविध ठिकाणी जिल्हा प्रशासन, पोलिस प्रशासन, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी तसंच एनसीसीचे विद्यार्थी एकता दौडमध्ये सहभागी झाले होते. सर्वसामान्य नागरिकांचाही विविध ठिकाणी सहभाग होता.

**दक्षता पदक**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दिली जाणारी केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं काल जाहीर करण्यात आली. एकंदर 1 हजार 466 पोलिस कर्मचाऱ्यांना ही पदकं जाहीर झाली असून, त्यामध्ये महाराष्ट्रातल्या नऊ जणांचा समावेश आहे. कारवाई, तपास, गुप्तचर यंत्रणा, न्यायवैद्यक विज्ञान आदी चार क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलिस यंत्रणांतील कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो. तपास विभागात पोलिस निरीक्षक भगवान नारोडे, पल्लवी चव्हाण, उपविभागीय अधिकारी गणपत पिंगळे, किशोर काळे, शर्मिष्ठा वालावलकर, सहायक पोलीस निरीक्षक रुपाली पोळ, श्रवण दाठ आणि विवेक पाटील यांना तर न्यायवैद्यक विज्ञान विभागात अ श्रेणीचे उपसंचालक संदीप चेट्टी यांना पदकं जाहीर झाली आहेत.

**इंदिरा गांधी**

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त, काल देशभरात त्यांना आदरांजली वाहण्यात आली. दिल्लीत शक्तीस्थळ इथं लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, आणि काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी त्यांना आदरांजली वाहिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहिली.

**मुख्यमंत्री- उद्योग आढावा**

राज्यात सध्या 154 सुधारणांचा समावेश असलेली जिल्हा व्यवसाय सुधारणा कृती योजना राबवण्यात येत आहेत. राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांसाठी चिंतन शिबिरं तसंच विभागीय बैठकाचं आयोजन करण्यात येणार असून, जिल्हाधिकाऱ्यांना जास्त अधिकार प्रदान करण्यात येतील असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. व्यवसाय सुलभतेसंदर्भातील आढावा बैठकीत ते काल मुंबईत बोलत होते. यावेळी मुख्य सचिव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी दूरस्थ प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. राज्याच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी सहा समित्या नेमण्यात आल्या असून वर्षाअखेरपूर्वी त्या आपले अहवाल सादर करणार आहेत. महाराष्ट्रानं गेल्या वर्षीच्या व्यवसाय सुलभता मूल्यांकनात 402 पैकी 399 सुधारणा पूर्ण करुन लक्षणीय प्रगती नोंदवली असल्याचंही फडणवीस यांनी या बैठकीत नमूद केलं. दरम्यान, फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणाच्या चौकशीसाठी महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वात विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी काल राज्याच्या पोलिस महासंचालकांना दिले आहेत.

**वेळापत्रक**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने येत्या फेब्रुवारी मार्चमध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. त्यानुसार बारावीची परीक्षा 10 फेब्रुवारीपासून, तर दहावीची परीक्षा 20 फेब्रुवारीपासून सुरू

होईल. दोन्ही परीक्षा 18 मार्च रोजी संपतील. प्रात्यक्षिक परीक्षा 23 जानेवारीपासून सुरू होतील. मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केलेलं वेळापत्रक माहितीसाठी आहे; परीक्षेपूर्वी शाळा महाविद्यालयांकडे दिलं जाणारं छापील वेळापत्रकच अंतिम असेल; अन्य समाजमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या वेळापत्रकावर विश्वास ठेवू नये, असं मंडळानं कळवलं आहे.

**सिंधुदुर्ग- निती आयोग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रशासनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा प्रभावी वापर केला जात असून, या आराखड्याच्या सखोल अभ्यासासाठी नीती आयोगाची चमू कालपासून सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्यावर आली आहे. आयोगाच्या सदस्यांनी, सागरी सुरक्षेसाठी वापरात असलेल्या एआय आधारित सिंधुप्रहरी या उपक्रमाविषयी, तसंच पोलिस विभागाच्या सुरक्षित सिंधुदुर्ग या प्रणालीचाही माहिती घेतली. जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्ट्य, मनुष्यबळाचा तुटवडा, हवामान, संपर्क यंत्रणा यांविषयीच्या आव्हानांवर एआयच्या मदतीनं केलेली मात याविषयी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काळे यांनी माहिती दिली. निती आयोगानं जिल्ह्यात वापरल्या जाणाऱ्या प्रणालीविषयी समाधान व्यक्त केलं.

**कुसुमाग्रज साहित्य पुरस्कार-नाशिक**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वतीनं दिला जाणारा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार ओडिया कवी हरप्रसाद दास यांना जाहीर झाला आहे. 2010 पासून सुरू झालेला हा पुरस्कार दरवर्षी अ-मराठी कवीला दिला जातो. रोख एक लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र असं पुरस्काराचं स्वरूप असून लवकरच या पुरस्काराचं वितरण होणार आहे.

**क्रिकेट**

मेलबर्नमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या वीस षटकांच्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताला 4 गडी राखून हरवलं. प्रथम फलंदाजी करताना अभिषेक शर्मा आणि हर्षित राणा वगळता बाकी भारतीय फलंदाज दुहेरी धावसंख्या गाठू शकले नाहीत. ऑस्ट्रेलियानं हे आव्हान चौदाव्या षटकातच पार केलं. मालिकेतील तिसरा सामना उद्या होबार्ट इथं खेळला जाणार आहे. दरम्यान आय सी सी महिला विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना उद्या भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात मुंबईत खेळला जाणार आहे.

**हवामान**

राज्यात तुरळक ठिकाणी पावसाच्या सरी पडण्याची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.